**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**

नवीन प्रशासकीय इमारत. तळमजला. विधानभवनासमोर. पुणे-411 001

फोन - 020-26123826    ईमेल -do5.igro@igrmaharashtra.gov.in

---

क्र.का.५/मुद्रांक २१/ प्र.क्र.०६/२०१६ /४८० /२१    दि. २७/१०/२०२१

**आदेश**

वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. DO No.-06/2/2019-BO.II दि. ११/०८/२०२० नुसार नागरीकांना सुविधा होण्याच्या दृष्टीने ई-साईनींग व ई-स्टॅपींगची प्रणाली नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमीटेड (NeSL) या कंपनीद्वारे विकसीत करण्याचे निर्देश मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र सरकार यांना दिलेले आहेत. भारतीय रिजर्व बॅकेच्या क्र. RBI/2017-18/110, DBR.No.Leg.Bbc.98/09.08.019/2017-18 दि. १९/१२/२०२० या पत्रानुसार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमीटेड (NeSL) ही 'भारतीय दिवाळखोरी व शोधन अक्षमता मंडळ' [माहीती उपयोगितता (IUs)] नियमन २०१७ (Insovency and Bankruptcy Board of India) दि. २५/०९/२०१७ अन्वये केंद्र सरकारद्वारे मान्यताप्राप्त माहीती उपयोगितता (Information Utility) आहे.

त्या अनुषंगाने नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमीटेड (NeSL) या संस्थेने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद १०(ड) द्वारे मुद्रांक शुल्क भरणा करण्यासाठी सहभागी बॅकांसोबत प्रणाली तयार केलेली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध अधिसुचना क्र. असाधारण चार-ब क्रमांक २६९ दि. २३/०९/२०२१ नुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या खालील अनुच्छेदांच्या अनुषंगाने मुद्रांक शुल्क भरणा सदर प्रणालीद्वारे होणार आहे.

| महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचा अनुच्छेद क्र. | दस्तऐवजाचा प्रकार |
|---|---|
| १ | ऋणाची अभिस्वीकृती |
| ४ | प्रतिज्ञालेख |
| ५(ह) (अ) (चार) | करारनामा किंवा त्याची नोंद किंवा सामंजस्य करारनामा (जर तो गहाणखत, हक्कलेख-निक्षेप, हडप, तारण किंवा तारण गहाण यामध्ये मोडत नसेल तर) |
| ६(२) | जंगम मालमत्तेचे तारण किंवा तारण गहाण |
| १३ | बंधपत्र |
| ३५ | क्षतिपूर्ति बंधपत्र |
| ४८ | मुखत्यारनामा [अनुच्छेद ४८ (फ) वगळून] |

| | |
|---|---|
| ५३ | नौभार बंधपत्र |
| ५४ | प्रतिभूती बंधपत्र |

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १०(ड) अंतर्गत मुद्रांक शुल्क आकारणीची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, निष्पादित सामंजस्य करारानुसार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्व्हीस लि. (NeSL) या कंपनीस, उपरोल्लेखीत अनोंदणीकृत दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यासाठीची प्रणाली कार्यान्वित करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सोबत :- निष्पादित सामंजस्य करारनाम्याची प्रत

(श्रावण हर्डीकर)

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**

**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति- Managing Director and CEO
National e-Governance Services limited
003A, Ground floor, The estate,
121, Dickenson Road, Bengluru- 560042

प्रत सादर-

1. कार्यासन अधिकारी, (म-1)
   महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई – 32
2. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
3. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे.
4. सर्व नोंदणी उप महानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक